# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२६–२७/१३४ दि. ०७/०७/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे शहर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'पुणे प्रथम–सेवा वारी' अंतर्गत 'कलावारी' छायाचित्रण स्पर्धा आणि विश्वप्रार्थना उपक्रमामध्ये सहभागी होण्याबाबत..

संदर्भ : १.मा. महापौर, पुणे यांचे दि. ०३/०७/२०२६ रोजीचे पत्र
२.मा.कुलगुरू यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र आवक क्र.व्हीसी ३७२९,दि.०६ जुलै २०२६ रोजी अग्रेषित

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये मा.महापौर यांनी सुचित केल्यानुसार, महाराष्ट्राचे वैभव असलेल्या आषाढी पालखी सोहळा लवकरच आपल्या पावन पुणे नगरीत आगमन करीत आहे. पुण्यात येणाऱ्या लाखो वारकरी बांधवांना स्वच्छ, सुदंर आणि सेवाभावी पुण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी पुणे महानगरपालिकेतंर्गत 'पुणे प्रथम–सेवा वारी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

'सेवा हीच वारी' या भावनेतून वारीचा मार्ग स्वच्छ व कचरामुक्त ठेवणे, प्लास्टिक निर्मुलन आणि वारकऱ्यांची उत्तम सेवा व्यवस्था करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये "कलावारी" अंतर्गत 'छायाचित्रण स्पर्धा' आणि 'विश्वप्रार्थना–सामुहिक पसायदान पठण' या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांना सदर उपक्रमांमध्ये सहभागी होण्याबाबत सुचित करण्यात यावे. उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता https://punepratham.org/ या वेबसाईटवरून नावनोंदणी करणे अनिवार्य आहे. सदर उपक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. महापौर, पुणे यांचे पत्र

मनपा कार्यालय : ०२० २५५०१०१०
भ्रमणध्वनी : ९८५०९८९९९१ / ८६००४०६६६६
Email : mayorpune@punecorporation.org

सौ. मंजुषा दीपक नागपुरे
महापौर, पुणे

दिनांक : / /

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-०७
आवक क्र. 205
दिनांक: 06 JUL 2026
राष्ट्रीय सेवा योजना
शाखा-

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 03 JUL 2026
आवक क्रमांक व्हीसी 3729
जावक दिनांक 06 JUL 2026

नगरसचिव कार्यालय
जावक क्र.: 1990
दिनांक: 03/07/26

प्रति,

माननीय कुलगुरू महोदय,

पुणे विद्यापीठ,

पुणे.

**विषय:** 'पुणे प्रथम - सेवा वारी' उपक्रमांतर्गत विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना स्वयंसेवक (Volunteers) म्हणून सहभागी करून घेण्याबाबत, 'कलावारी' छायाचित्रण स्पर्धा आणि 'विश्वप्रार्थने'त जोडण्याबाबत विनंती.

महोदय,

राम कृष्ण हरी!

आपणास विदितच आहे की, महाराष्ट्राचे परम वैभव असलेला आषाढी पालखी सोहळा लवकरच आपल्या पावन पुणे नगरीत आगमन करीत आहे. या पवित्र पर्वावर, पुण्यात येणाऱ्या लाखो वारकरी बांधवांना स्वच्छ, सुंदर आणि सेवाभावी पुण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी पुणे महानगरपालिका अंतर्गत 'पुणे प्रथम' आयोजित **'सेवा वारी'** हा विशेष उपक्रम अत्यंत श्रद्धेने व जबाबदारीने राबविण्यात येत आहे.

**"सेवा हीच वारी"** या भावनेतून वारीचा मार्ग स्वच्छ व कचरामुक्त ठेवणे, प्लास्टिक निर्मूलन आणि वारकऱ्यांची उत्तम सेवा-व्यवस्था करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या एवढ्या मोठ्या आणि पवित्र कार्यात आपल्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील तरुणाईची ऊर्जा, उत्साह आणि सामाजिक जाणीव अत्यंत मोलाची ठरणार आहे.

आपल्या विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थी हे नेहमीच विविध सामाजिक उपक्रमांत, कला-संस्कृती आणि राष्ट्रउभारणीच्या कार्यात हिरिरीने भाग घेत असतात. वारीच्या काळात संपूर्ण पालखी मार्गावर स्वच्छतेचा संदेश देणे, प्लास्टिक मुक्तीसाठी श्रमदान करणे आणि व्यवस्थापनात मदत करणे यामध्ये कॉलेजचे तरुण अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. यातून विद्यार्थ्यांना एक उत्तम सामाजिक अनुभव, संवेदनशीलता आणि संस्कारही लाभतील. या उपक्रमाचा मुख्य भाग म्हणून खालील दोन विशेष मोहिमांचे आयोजन करण्यात आले आहे:

**१) 'कलावारी' अंतर्गत छायाचित्रण (Photography) स्पर्धा:**

वारीचे विहंगम दृश्य, भक्तीभाव आणि सेवाभाव कॅमेऱ्यात टिपण्यासाठी 'कलावारी' अंतर्गत ओपन कॅटेगरीसाठी (सर्व वयोगटांसाठी खुली) एक विशेष 'छायाचित्रण स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे.

- **कालावधी:** ५ जुलै २०२६ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असून ३१ जुलै २०२६ रोजी समाप्ती होईल.
- **सहभाग कसा नोंदवावा?:** विद्यार्थ्यांनी 'puneoratham.org' च्या अधिकृत वेबसाईटवरून स्वतःची नोंदणी करायची आहे आणि आपले सर्वोत्तम फोटो अपलोड करायचे आहेत.

- **पारितोषिक:** या स्पर्धेतील उत्कृष्ट **प्रथम ५ विजेत्यांना रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह** देऊन महापालिकेतर्फे गौरवण्यात येईल. तरी आपल्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या छायाचित्रण स्पर्धेत भाग घ्यावा, यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.

२) **'विश्वप्रार्थना - सामूहिक पसायदान पठण'** उपक्रम:

या सेवा वारीचे मुख्य आध्यात्मिक व सामाजिक आकर्षण म्हणजे माऊलींच्या पुणे मुक्कामादरम्यान भवानी पेठ येथे **दिनांक १० जुलै २०२६ रोजी** आयोजित करण्यात आलेली **"विश्वप्रार्थना - सामूहिक पसायदान पठण"** मोहीम. संत ज्ञानेश्वर माऊलींनी विश्वकल्याणासाठी दिलेले पसायदान हे संपूर्ण मानवतेची सेवा आणि समतेचा संदेश देणारे आहे. या पवित्र सोहळ्यात सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबासह डिजिटल लिंकद्वारे ऑनलाईन पद्धतीने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असा आमचा मानस आहे.

**स्वयंसेवकांसाठी नोंदणी व सहभाग प्रमाणपत्र:**

सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी 'पुणे प्रथमच्या' अधिकृत पोर्टलवरून 'punepratham.org' वर जाऊन आपली 'स्वयंसेवक' (Volunteer) म्हणून या मोहिमेत प्रत्यक्ष सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांना पुणे महानगरपालिकेतर्फे विशेष 'सहभाग प्रमाणपत्र' (Certificate) डिजिटल स्वरूपात दिले जाईल, जे उपक्रमानंतर 'पुणे प्रथमच्या' अधिकृत पोर्टलवरून 'punepratham.org' वरून थेट डाऊनलोड करता येईल.

**आमची नम्र विनंती:**

एक जबाबदार प्रथम नागरिक आणि पुणे शहराच्या सामूहिक जबाबदारीच्या भावनेतून, आपणास नम्र विनंती आहे की, आपल्या स्तरावरून विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना (NSS), एनसीसी (NCC) प्रमुख, सांस्कृतिक मंडळे आणिं विद्यार्थ्यांना या 'सेवा वारी', 'कलावारी छायाचित्रण स्पर्धा' व 'विश्वप्रार्थना' मोहिमेची अधिकृत माहिती देऊन, त्यांना यात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्यासाठी निर्देशित व प्रोत्साहित करावे.

पुण्यातील तरुण शक्तीच्या सळसळत्या उत्साहाने आणि कलागुणांनी या अभियानाला नक्कीच अभूतपूर्व बळ मिळेल, हा आम्हाला ठाम विश्वास आहे.

सहकार्याची अपेक्षा!

**आपली विश्वासू,**

**सौ. मंजुषा दीपक नागपुरे**

महापौर, पुणे.